# हॅलो प्रभात

## राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी 'विवेकानंद'च्या अनुष्का पाटीलची निवड





**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

इंदापूर येथे २७ ते २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान झालेल्या राज्यस्तरीय १७ वर्षाखालील मुलींच्या शालेय कुराश स्पर्धेत विवेकानंद कॉलेजची अनुष्का अजित पाटील (इयत्ता ११वी, विज्ञान) हिने अतिशय दमदार कामगिरी करत सुवर्णपदकाची कमाई केली. तिच्या या उज्ज्वल कामगिरीच्या जोरावर तिची उत्तरप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली असून कोल्हापूरचा अभिमान आणखी उंचावला आहे.अनुष्काच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे. तिच्या यशामागे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे व सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे महत्त्वपूर्ण प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात, ज्युनिअर जिमखाना प्रमुख प्रा. संतोष कुंडले, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस.के. धनवडे व सुरेश चरापले यांचेही विशेष मार्गदर्शन तिला मिळाले. अनुष्काने राष्ट्रीय पातळीवर चमकावी, अशी अपेक्षा महाविद्यालय व संस्थेमार्फत व्यक्त करण्यात आली आहे.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राज

● शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५



अनुष्का पाटीलचे अभिनंदन करताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे. सोबत डॉ. एस. पी. थोरात, प्रा. संतोष कुंडले आदी.

# राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी अनुष्काची महाराष्ट्र संघात निवड

**जनप्रवास : कोल्हापूर**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत तथा जिल्हा क्रीडा परिषद इंदापूरातील शहा सांस्कृतिक भवनमध्ये १७ वर्षाखालील मुली या राज्यस्तर शालेय कुराश स्पर्धा झाल्या. स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींमधून इयत्ता ११ वी विज्ञान शाखेतील अनुष्का पाटीलने सुवर्ण पदक मिळविले. तिची उत्तरप्रदेशातील राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

संघातील खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रा. संतोष कुंडले, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रशांत कांबळे, साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी विविधांगी विचार करावा : भोसले

कोल्हापूर, ता. ४ : बदललेली शैक्षणिक अध्यापनपद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपरिक चौकट संपली आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी करिअर व आयुष्यातील विविध प्रश्नांप्रती चौकसपणे विचार करण्याची सवय लावून घ्यावी. यामुळे येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आव्हानांनाही सक्षमपणे सामोरे जाता येईल, असे मत महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजित भोसले यांनी आज येथे व्यक्त केले.

ताराबाई पार्क येथील विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. थोरात होते. जितेंद्र भरमगोंडा यांनी प्रास्ताविक केले. नेहा मेहरवाडे यांनी सूत्रसंचालन केले. सायली वाडकर यांनी आभार मानले.